अमरावती महानगरपालिका, अमरावती

कार्यालय :- महानगरपालिका अमरावती
जा. क्र. अमनपा/ससंनर/ ०६ /२०१९
दिनांक :92/०७/२०१९

प्रति,

श्री. सचिन केशवराव इंगोले
रा.अमरावती

विषय :- मौजा- बडनेरा, ता.जि. अमरावती येथील शेत सर्व्हे नं. ३१९/१अ, क्षेत्र ०.४० हेक्टर आर पैकी ३४२४ चौ.मी. सिमांकित अभिन्यासास नकाशास रहिवासी वापराकरिता (ग्रुप हाऊसिंग) अंतीम मंजूरीची परवानगी मिळणेबाबत.

संदर्भ :- १) या कार्यालयाची तात्पुरती/तांत्रिक मंजुरी पत्र क्र.अमनपा/ससंनर अभि/०४/२०१९, दि.२५/०४/२०१९
२) आपला दिनांक ०९/०७/२०१९ रोजीचा अर्ज.

विषयांकीत जागेच्या प्रस्तावित निवासी अभिन्यास नकाशास या कार्यालयाचे संदर्भीत पत्र क्र.१ अन्वये सिमांकनाकरीता शिफारस केली आहे. आता संदर्भीय पत्र क्र.२ अन्वये अर्जदार/जमीनमालक/विकासकर्ते यांनी प्रस्तावासोबत सिमांकित अभिन्यास नकाशे व उपअधिक्षक भुमि अभिलेख,अमरावती यांचेकडील सिमांकीत मोजणी नकाशा मो.र.क्र.६९/अतितातडी बिनशेती/१९ क दि.१२/०६/२०१९ दाखल केले आहे, सदर सिमांकीत अभिन्यास नकाशे हे सर्वसाधारणपणे योग्य आढळून येत असल्याने सदर अभिन्यासास अंतीम मंजुरीची व अभिन्यासाखालील जागा निवासी वापराकरिता परिवर्तीत करण्यासाठी खालील शर्ती व अटींवर शिफारस करण्यात येत आहे.

१) नियोजन प्राधिकरणाच्या पुर्व परवानगीशिवाय कोणत्याही भुखंडाचे भविष्यात विभाजन करता कामा नये.
२) अभिन्यासातील खुली जागा/ बगीचा/ खेळाचे मैदान/ दुकान/ माळा/ बालवाडी इत्यादी करीता प्रस्तावित केलेल्या जागे व्यतिरिक्त संपूर्ण निवासी अभिन्यासातील भुखंड फक्त निवासी वापराकरिताच अनुज्ञेय राहतील.
३) सार्वजनिक उपयोगाकरिता प्रस्तावित केलेल्या खुल्या जागेचा/ भुखंडाचा उपयोग/ वापर त्याच कामाकरिता करण्यात यावा.
४) प्रस्तुत अभिन्यास एक सामाईक भुखंड (ग्रुप हाऊसिंग) करीता प्रस्तावित असल्याने अभिन्यासातील रस्ते व सार्वजनिक खुली जागा विकसित केल्यानंतर देखरेखीकरिता विनामुल्य मनपाकडे हस्तांतरीत करण्यात यावे.
५) महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम १९६६ अंतर्गत आवश्यक ते विकास शुल्क भरणा करुन मनपाची पुर्व परवानगी घेतल्याशिवाय या जागेवर कोणत्याही प्रकारचे बांधकाम करता येणार नाही.
६) विषयांकित जागेतून उच्च दाबाची विद्युत वाहीनी किंवा दुरध्वनीवाहीनी जात असल्यास ती रस्त्याच्या कडेला स्थानांतरीत केल्याशिवाय भुखंडाची विक्री किंवा त्यावर कोणत्याही प्रकारचे बांधकाम करता येणार नाही.
७) इतर बाबतीत स्थानिक प्राधिकरणाच्या नियमांचे पालन करावे.
८) अभिन्यासातील विक्री करण्यात आलेल्या प्रत्येक भुखंडाच्या विक्रीची माहिती (खरेदीखताची प्रत) या विभागात नोंदविणे आपल्याला बंधनकारक राहील.
९) अभिन्यासातील भुखंडावर बांधकाम करतांना छतावरील पावसाचे पाणी संकलन त्याचे जनिमीमध्ये पुर्नभरण करण्याच्या प्रकल्पाचे बांधकाम करणे महाराष्ट्र शासनाच्या धोरणानुसार बंधनकारक राहील.
१०) अभिन्यासातील खुल्या जागेवर अभिन्यासामधील सर्व भुखंड धारकांचा हक्क राहील.
११) सदर्हु अभिन्यासातील सर्व प्राथमिक विकास कामे पुर्ण करुन द्यावी लागतील. तसेच पथदिव्याचे विद्युत पुरवठ्याकरीता स्वतंत्र मीटर व पथदिवे चालु बंद करण्याकरीता स्विचेस यांची व्यवस्था करावी. सदर्हु प्राथमिक विकास कामांचे पुर्णत्वानंतर ३ वर्षापर्यंत देखभाल व दुरुस्ती जमीन मालक/विकासक यांना करावी लागेल. त्याबाबत म.न.पा. चे शहर अभियंता विभागाचे निर्देशानुसार पुर्तता करुन ३ वर्षानंतर सदर्हु विकास कामे सुस्थितीत मनपास हस्तांतरीत करावी लागतील.